**<u>प्रेसनोट</u>**

दि. २४/०३/२०२१

## पवना हॉस्पीटल सोमाटणे फाटा ता. मावळ येथील डॉक्टर व मार्केटींग अधिकाऱ्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | तळेगांव दाभाडे, पोलीस स्टेशन, गु.र.नं. १२१/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,१२ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी - १) सत्यजित कृष्णकांत वाढोकर , वय – ५८ वर्षे, व्यवसाय - डॉक्टर, पवना हॉस्पीटल, सोमाटणे फाटा ता. मावळ जिल्हा पुणे.<br>२) प्रमोद वसंत निकम, वय - ४५ वर्षे मार्केटिंग अधिकारी - पवना हॉस्पीटल |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/-(दहा हजार रूपये)<br>पडताळणी दरम्यान तडजोडीअंती ९,०००/- रूपये |
| लाच स्वीकारली रक्कम | ९,०००/- (नऊ हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी दिनांक :- दि. २३/०३/२०२१<br>सापळा दिनांक :- २३/०३/२०२१<br>तक्रारदार यांचे वडीलांचे डायलेसीसचे मोफत उपचार महात्मा फुले जन-आरोग्य योजने अंतर्गत आरोपी क्रमांक १ यांचे पवना हॉस्पीटलमध्ये सुरू होते. सदरची शासकीय योजना व या योजनेअंतर्गत औषधोपचार हे पुर्णपणे मोफत असतानासुद्धा सदर उपचार करण्यासाठी आरोपी क्रमांक १ यानी १०,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ९,०००/- रूपये लाच मागणी केली व आरोपी क्रमांक २ यास ती रक्कम घेण्यास सांगितली ती रक्कम आरोपी क्र. २ याने स्वीकारली म्हणून तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन, येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून मा. विशेष न्यायालयाने अटक आरोपींना दिनांक २६/०३/२०२१ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. गुन्हयाचा तपास श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे,पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.